पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक ११
सभावृत्तांत

दिनांक:- ८/०१/२०१६ वेळ.दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ८/०१/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या व स्विकृत सदस्य उपस्थित होते.

१. मा.बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा.स्वाती प्रमोद साने
५. मा.जाधव साधना रामदास
६. मा.जाधव राहुल गुलाब
७. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
८. मा.भालेकर पंकज दत्तात्रय
९. मा.पवार जितेंद्र हनुमंत
१०. मा.भालेकर प्रविण महादेव

याशिवाय श्री. दिलीप गावडे (क्षेत्रीय अधिकारी), श्री. विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्रीम.प्रभावती गाडेकर (कार्यालयीन अधिक्षक), श्री.संदेश चव्हाण (कार्यकारी अभियंता विद्युत), श्री. प्रदीप पुजारी (प्र.कार्यकारी अभियंता जलनि:सारण / उपअभियंता झोनिपू), श्री.पी.जी.जाधव (लेखाधिकारी), श्री.नायकवाडी बी.एस. (लेखापाल), श्री.हनुमंत शिंदे उपअभियंता (जलनि:सारण), श्री.नरोटे सुनिलदत्त (उपअभियंता स्था) श्री. विजय शिंदे उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.व्ही.बी.माने उपअभियंता (नगररचना), श्री. जाधव व्ही.के. (उपअभियंता स्था.उद्यान), श्री. शिर्के डी.जे. (मुख्य आरोग्य निरीक्षक), श्री.कुलकर्णी एस.एस. (मुख्य आरोग्य निरीक्षक),श्री.मोरे सी.सी.हॉर्टी सुपरवायझर, श्री.ई.एच.बंडवल हॉर्टी सुपरवायझर, श्री.तानाजी गायकवाड हॉर्टी सुपरवायझर, श्री.शितोळे एस.के. क.अभि. झोनिपू स्था, श्री.कुलकर्णी आर.पी.,श्री.रोकडे बी.जी.,क.अभियंता, श्री.माळी एस.के. आरोग्य निरीक्षक, श्री.नंदकिशोर वाघ मुख्य लिपीक, श्री. गिरमकर तुकाराम मुख्य लिपीक, कु.प्राजक्ता गव्हाणे (क.अभियंता स्था.उद्यान),श्री.नांगरे एस.ए.क.अभियंता विद्युत श्री.सुभाष पवार ( क्रीडा पर्यवेक्षक), इ. अधिकारी सभेस हजर होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१** आरोग्य विभागाकडील तरतूद वर्गीकरणाबाबत –

मा साधना जाधव व मा.राहुल जाधव यांचा प्रस्ताव

**विषय क्र.२** प्रभाग क्र.५ कुदळवाडी, जाधववाडी हद्दीमधील से.नं.१३ या भागातील मुख्य चौकास **"राजमाता जिजाऊ चौक"** हे नांव देणेबाबत व से.नं.१३ मधील मुख्य रोडला **"राजमाता जिजाऊ नगर मार्ग"** असे नामकरण करणेबाबत – मा.राहुल जाधव, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव

**विषय क्र.३** चिखली मधील रिव्हर रेसिडेन्सी चौकाला "कै.नामदेव दगडू साने चौक" असे नामकरण करणेबाबत - मा.स्वाती साने व मा. मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव

दि. ११/१२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्र. २८ — विषय क्र.१
दि. ८/०१/२०१६ — विभाग .......
सुचक:- मा.साधना जाधव — अनुमोदक:- मा. राहुल जाधव
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/८/कावि/०२/२०१६ दि. १/०१/२०१६ चा प्रस्ताव

फ क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१५ – १६ चे सुधारित व सन २०१६ -१७ चे मूळ अंदाजपत्रक तयार करुन मा.प्रभाग समितीपुढे सादर करावयाचे आहे. त्याकामी अंदाजे १५० पानांचे एक या प्रमाणे ४० अंदाजपत्रक पुस्तकाच्या प्रतीची छपाई करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे रक्कम रुपये ४०,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकांचे पुस्तकाची तातडीची बाब म्हणून कोटेशन पध्दतीने दर मागवून कररनामा करुन छपाई करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

-----

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्र. २९ — विषय क्र.२
दि. ८/०१/२०१६ — विभाग .......
सुचक:- मा.साधना जाधव — अनुमोदक:- मा.राहुल जाधव
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/३/कावि/३०/२०१६ दि. ८/ ०१/२०१६ चा प्रस्ताव

फ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील खाजगीकरणाद्वारे साफसफाई "या लेखाशिर्षावर सन २०१५ – १६ करीता तरतुद र.रु. ३,४०,००,०००/- करणेत आली आहे. सदर तरतुदीमधून दि. २८/१२/२०१५ अखेर ३.१०,४४,२०९/- इतका खर्च झालेला असुन र.रु. २९,५५,७९१/- शिल्लक आहे.

रस्ते गटर्स दैनंदिन साफसफाई, स्वच्छतागृह साफसफाई घरोघरचा कचरा गोळा करणे या कामासाठी "खाजगीकरणाद्वारे साफसफाई" या लेखाशीर्षा मधून खर्ची टाकणेत येतो त्यामुळे या लेखाशीर्षावर उर्वरित ३ महिन्यांकरीता अंदाजे र.रु. १,१३,३७,५००/- इतका खर्च अपेक्षीत असल्यामुळे तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे.

फ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील कचराकुंडी विरहित वार्ड योजना वाहने भाडयाने घेणे या लेखशीर्षावरुन र.रु.३०,००,०००/- हॉटेल वेस्ट वाहतुक खर्च या लेखाशीर्षावरुन र.रु.४,५०,०००/- साफसफाई मुशाहीरा दंड या लेखाशिर्षावरुन र.रु. ७८,०००/- स्थायी अस्थापना या लेखाशीर्षावरुन र.रु. ७०,००,०००/- व ठेकेदार पध्दतीने हायसिंग निर्मुलन करणे या लेखाशीर्षावरुन र.रु.२,००,०००/- असे एकुण र.रु. १,०७,२८,०००/- (अक्षरी र.रु. एक कोटी सात लाख अठ्ठावीस हजार फक्त ) इतकी रक्कम "खाजगीकरणाद्वारे साफसफाई" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र. ३० विषय क्र.३

दि. ८/०१/२०१६ विभाग .......

सुचक:- मा.राहुल जाधव अनुमोदक:- मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ:- मा.राहुल जाधव व मा.सुरेश म्हेत्रे यांचा दि. ८/०१/२०१६ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.५ कुदळवाडी जाधववाडी हद्दीमधील से.नं. १३ या भागात खुप मोठया प्रमाणात लोकसंख्या वाढलेली असुन त्या ठिकाणच्या रहीवाश्यांच्या मागणीनुसार त्या भागातील मुख्य चौकास **"राजमाता जिजाऊ चौक"** असे नांव देणेबाबत व से.नं. १३ मधील मुख्य रोडला" **राजमाता जिजाऊ नगर मार्ग "** असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. ३१ विषय क्र.४

दि. ८/०१/२०१६ विभाग .......

सुचक:- मा.स्वाती साने अनुमोदक:- मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ:- मा.स्वाती साने व मा.मंदाकिनी ठाकरे यांचा दि. ८/०१/२०१६ चा प्रस्ताव

विषय:- चिखली मधील रिव्हर रेसिडेन्सी चौकाला "कै.नामदेव दगडू साने चौक" असे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(बो-हाडे शुभांगी संजय)
सभापती
फ प्रभाग समिती

क्रमांक – फक्षेका/सभा/कावि/ ७ /२०१६
दिनांक- १४ /०१/२०१६

सही/-
(प्रशासन अधिकारी)
सचिव सभाशाखा
फ क्षेत्रीय कार्यालय